# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार , दि. २३ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३१ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१९१० : डॉ.राम मनोहर लोहिया यांचा जन्मदिन.

१९३१ : सरदार भगतसिंग, सुखदेव, शिवराम, राजगुरु यांना लाहोर तुरुंगामध्ये संध्याकाळी साडेसात वाजता फाशी देण्यात आली. हे क्रांतिकारक देशासाठी हसतहसत फासावर चढले. हुतात्म्यांचं पुण्यस्मरण.

१९९९ : लता मंगेशकर व पंडित भीमसेन जोशी यांना पद्म-भूषण पुरस्कार मिळाला.

| सेन्सेक्स | ७४,५३२.९६ | +३२५.७२ (०.४४%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ९४.०१ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३७ | १८ |
| दिल्ली | ३० | १८ |
| मुंबई | ३७ | २४ |
| नागपूर | ३५ | १९ |
| पुणे | ३८ | १६ |

**सुविचार**

तुमच्या हृदयातील प्रेमाची भाषा बोला, आणि जगाला एक सुंदर ठिकाण बनवा.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:२९ | संध्या-६:४० |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५१,६९५/- | २,४५,०००/- |

# अमेरिका-इराण युद्धविरामासाठी शांतता चर्चेस वेग

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले युद्धबंदीचे संकेत

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धाला तब्बल २० दिवस होऊन गेले आहेत. मात्र, अद्यापही हे युद्ध सुरू असून दररोज अमेरिका-इस्रायल इराणवर हल्ले करत आहेत तर इराणही प्रतिहल्ले करत आहे. या युद्धात आतापर्यंत इराणच्या सर्वोच्च नेत्यासह अनेक दिग्गज नेत्यांचा आणि लष्करी अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. या युद्धात इराणचं सर्वाधिक मोठं नुकसान झालं आहे, तरीही इराणने माघार घेतलेली नाही.**





इराणने शनिवारी अमेरिकेवर सर्वाधिक लांब पल्ल्याचा हल्ला केला. इराणने हिंद महासागरातील अमेरिकेच्या डिएगो गार्सिया हवाई तळावर अनेक मिसाईल्स डागल्या आहेत. डिएगो गार्सिया हवाई तळ हे इराणपासून तब्बल ४,००० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे इराणची क्षेपणास्त्र क्षमता वाढल्याचं यावरून दिसत आहे. दरम्यान, या युद्धाबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे.

अमेरिका-इराण युद्ध थांबणार असल्याचे संकेत मिळत आहेत. युद्धविरामाबाबत मोठी अपडेट समोर आली असून तीन आठवड्यांच्या संघर्षानंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने या युद्धात पुढे काय होऊ शकतं? यावर प्राथमिक चर्चा सुरू केली आहे.

दरम्यान, ट्रम्प यांनी शुक्रवारी म्हटलं होतं की ते युद्ध थांबवण्याचा विचार करत आहोत. तसेच अधिकाऱ्यांच्या मते हा संघर्ष आणखी दोन ते तीन आठवडे सुरू राहण्याची शक्यता आहे. त्याचवेळी त्यांचे सल्लागार संभाव्य राजनैतिक प्रयत्नांची तयारी सुरू करत असल्याची माहिती सांगितली जाते.

असं असलं तरी अलिकडच्या दिवसांत अमेरिका आणि इराण यांच्यात कोणताही थेट संवाद झालेला नाही. मात्र, इजिप्त, कतार आणि यूकेच्या मार्फत संदेशांची देवाणघेवाण झालेली आहे. या मध्यस्थांनी अमेरिका आणि इस्रायलला सांगितलं की इराण वाटाघाटींसाठी तयार आहे. पण कठोर अटींसह. इराण युद्धविराम आणि युद्ध पुन्हा सुरू होणार नाही याची हमी व नुकसान भरपाईची मागणीसाठी ठाम आहे.

● वृत्तानुसार, राजदूत जेरेड कुशनर आणि स्टीव्ह विटकॉफ हे इराणशी चर्चा केल्यास काय होऊ शकतं? किंवा कोणत्या मुद्यांवर चर्चा होऊ शकते? यावर विचारविनिमय करत असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. अधिकाऱ्यांच्या मते कोणत्याही करारामध्ये होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा पूर्व पदावर आणणं, इराणच्या समृद्ध युरेनियमच्या साठ्यावर तोडगा काढणं, अणुकार्यक्रम, बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे यावर दीर्घकालीन आराखडा तयार करण्यासह आदी मुद्यांचा समावेश असण्याची शक्यता आहे.

एका अमेरिकी अधिकाऱ्याच्या म्हणण्यांनुसार, अमेरिकेला असा विश्वास आहे की इराण अखेरीस वाटाघाटींच्या टेबलावर येऊ शकतो. अमेरिकेला इराणकडून अनेक अटी मान्य करून घ्यायच्या आहेत. जसं की पाच वर्षांसाठी कोणताही क्षेपणास्त्र कार्यक्रम नाही. तसेच युरेनियम संवर्धन शून्य करणं, नतान्झ, इस्फाहान आणि फोर्डो अणुऊर्जा प्रकल्प बंद करणं, प्रादेशिक देशांशी शस्त्र नियंत्रण करार ज्यात १,००० क्षेपणास्त्रांची मर्यादा आणि हिजबुल्लाह, हुथी आणि हमास यांसारख्या गटांना निधी न देणं.

## थोडक्यात



### भेसळयुक्त दुधामुळे मृत्यूचे तांडव! १६ जणांचा मृत्यू

**अमरावती ।** आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्हा येथे भेसळयुक्त दूध प्रकरणामुळे मोठी दुर्घटना घडली असून, तब्बल १६ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, आणखी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लालाचेरुवु, चौदेस्वरनगर आणि स्वरूपनगर या भागांत फेब्रुवारी महिन्यापासून भेसळयुक्त दूध विकले जात होते.

### दोन अमेरिकन पर्यटकांवर गुन्हा दाखल

**कोची ।** केरळमधील कोची येथे सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल दोन अमेरिकन पर्यटकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फोर्ट कोची परिसरात असलेल्या तटरक्षक दलाच्या मुख्यालयाजवळ ड्रोन उडवण्यास सक्त मनाई आहे, कारण हा परिसर रेड झोनमध्ये येतो आणि येथे नौदल व तटरक्षक दलाच्या महत्त्वाच्या कारवाया होतात.

# शाळांमध्ये मोबाईल बंदीचा जागतिक धडाका

## जगभरातील ११४ हून अधिक देशांनी उचलले बंदीचे पाऊल

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**सोशल मीडियामुळे मुलांच्या एकाग्रतेत होणारी घट, सायबर बुलिंग आणि मानसिक आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम लक्षात घेता, जगातील ५८ टक्के देशांनी शाळांमध्ये मोबाईल फोनवर बंदी घातली आहे.**



युनेस्कोच्या 'ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरिंग' पथकाने प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार, गेल्या तीन वर्षांत या बंदीच्या प्रमाणात मोठी वाढ झाली असून, तब्बल ११४ देशांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

मोबाईल बंदीचा हा कल अत्यंत वेगाने विस्तारत आहे. जून २०२३ मध्ये केवळ २४ टक्के देशांमध्ये अशी बंदी होती. २०२५ च्या सुरुवातीला हे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत पोहोचले आणि मार्च २०२६ पर्यंत ५८ टक्के देशांनी मोबाईलला शाळाबाहेर ठेवणे पसंत केले आहे. यामध्ये बोलिव्हिया, कोस्टा रिका, क्रोएशिया, मालदीव आणि माल्टा यांसारख्या देशांचा नव्याने समावेश (पान २ वर)

## आम्हीच त्याचा भांडाफोड केला

# अशोक खरात प्रकरणावर मुख्यमंत्र्यांचा खुलासा

प्रतिनिधी । नागपूर

**खरात प्रकरण अत्यंत गंभीर असून, आम्हीच गुप्तचर यंत्रणेच्या आधारावर त्याचा भांडाफोड केला, असा मोठा खुलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. नागपूरमधून माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक येथील कथित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात प्रकरणावर पहिल्यांदाच सविस्तर प्रतिक्रिया दिली.**

पुढे ते म्हणाले, आम्हाला कल्पना होती, की लाजेखातर किंवा (पान २ वर)

### ➤ फडणवीसांनी ठणकावले



अशोक खरात याच्याशी संबंधित असलेल्या मंत्र्यांचे राजीनामे मागितले जात आहेत. पण राजकीय व्यक्तींचे फोटो कोणसोबतही असू शकतात. ज्यांनी मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन खरातसाठी ४० किलोमीटरची पाण्याची लाईन मंजूर केली, त्यांना काय शिक्षा द्यावी? मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे या मुद्द्यावर शांत का बसतात? आम्हाला या सगळ्याचे राजकारण करायचे नाही. महिलांची प्रतिष्ठा आमच्यासाठी महत्त्वाची आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांना ठणकावून सांगितले.

# महाराष्ट्र केसरी गटात तीन माजी विजेत्यांचे आव्हान संपुष्टात

## सिकंदर, हर्षवर्धन अंतिम फेरीत




**अशा होणार अंतिम लढती**

- गादी विभाग– जय पाटील वि. हर्षवर्धन सदगीर
- माती विभाग–सिकंदर शेख वि. महेंद्र गायकवाड

उत्तरार्धात सुरुवातीला सिकंदर आक्रमक झाला. सुदर्शनने या वेळी बचाव भक्कम ठेवताना सिंकदरला पायाची पकड मिळवून दिली नाही. वेळ संपत असताना सिकंदर शांत होता. त्याने अत्यंत हुशारीने सुदर्शनला दमू दिले आणि नंतर प्रथम निष्क्रियतेचा आणि नंतर ताबा मिळवत दोन गुणांची कमाई करून कुस्ती ३-३ अशी बरोबरीत आणली. अखेरच्या मिनिटात सुदर्शनला स्टेप आऊट करत त्याने निर्णायक एक गुण मिळवून विजय मिळविला.

वृत्तसंस्था । पुणे

रामकृष्ण सातव कर्तव्य फाउंडेशनच्या वतीने आयोजित ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत गादी विभगातून हर्षवर्धन सदगीर, तर माती विभागातून सिकंदर शेख या माजी विजेत्यांचे आव्हान कायम राहिले आहे. पृथ्वीराज मोहोळ, पृथ्वीराज पाटील आणि शिवराज राक्षे या अन्य तीन माजी विजेत्यांची घोडदौड बाद फेरीत संपुष्टात आली.

वाघोली येथे उभारलेल्या स्व. अजित पवार क्रीडानगरीत सुरू असलेल्या या स्पर्धेत गादी विभागात पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळचा पराभव सर्वात धक्कादायक ठरला. वजनदार असलेल्या पृथ्वीराजला सोलापूरच्या काटक शरीरयष्टी लाभलेल्या जय पाटीलने अवघ्या सव्वा मिनिटात चितपट करून (पान २ वर)

### काँग्रेसच्या नेत्याचा अपघातात जागीच मृत्यू

वृत्तसंस्था । देवरिया

उत्तर प्रदेशातील देवरिया जिल्ह्यात भीषण रस्ते अपघातात काँग्रेसचे स्थानिक नेते जितेंद्र जयस्वाल यांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्घटना शनिवारी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास बरहाज येथील राम जानकी मार्गावर घडली. जितेंद्र जयस्वाल हे आपल्या दुचाकीवरून जात असताना समोरून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. धडकेनंतर तेगंभीर जखमी झाले होते.

# आता डिझेल प्रतिलिटर ५ रुपयांनी स्वस्त मिळणार

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीसाठी नवीन डिझेल खरेदी धोरण केले जाहीर

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्य परिवहन महामंडळ (एसटी) ची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सरकारने महत्त्वाची पावले उचलली आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी डिझेल खरेदी प्रक्रियेत मोठा बदल जाहीर केला आहे. स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेमुळे आता एसटीला प्रति लिटर तब्बल ५.१३ रुपयांची सवलत मिळणार आहे. त्यामुळे दरवर्षी सुमारे २४० ते २४१ कोटी रुपयांची बचत होणार आहे.**



पूर्वी एसटीला डिझेलवर केवळ २.७० रुपयांची सवलत मिळत होती, जी वाढवून ३ रुपये करण्यात आली होती. मात्र, नव्या पारदर्शक प्रक्रियेमुळे ही सवलत आणखी वाढली आहे. यासोबतच एसटी आता इंधन विक्रीच्या क्षेत्रातही उतरणार असून, पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलएनजी यांसारखी सर्व प्रकारची इंधने एसटीच्या पंपांवर उपलब्ध केली जाणार आहेत. सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून १०० ते ११० मल्टी-मॉडल इंधन पंप उभारण्याची योजना असून, यातून दरवर्षी सुमारे १०० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळण्याची अपेक्षा आहे. इंधन चोरी आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी एसटी पंपांवर एआय-आधारित सेन्सर्स बसवले जाणार आहेत. सध्याच्या प्रणालीत दर १०० लिटरमागे ४ ते ५ लिटर इंधनाची हानी होत असल्याचे (पान २ वर)

# राज्यातील हॉटेल, उपहारगृहांना २० टक्के गॅस पुरवठा

## सिलिंडर टंचाईबाबत मंत्री छगन भुजबळ यांनी दिली माहिती

वृत्तसंस्था । मुंबई

**अमेरिका, इस्त्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्धामुळे संपूर्ण जगावार तेल आणि गॅस टंचाईचे संकट गडद झाले आहे. या युद्धामुळे भारतातील गॅसचा साठा पाहता सरकारने केवळ घरगुती सिलेंडरचे उत्पादन आणि वितरण करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना दिले होते.**





केंद्र सरकारने सर्व उद्योगधंद्यांना गॅसचं वितरण करणं काही काळासाठी थांबवलं होतं. पण आता सरकारकडून परत गॅसचे वितरण केले जात आहे. दुसरीकडे गॅसचे वितरण बंद झाल्यामुळे राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहार गृह ठप्प झाले होते. पण राज्यातील हॉटेल व्यावसायिकांना दिलासा देणारं वृत्त समोर आलं आहे. केंद्र सरकारने याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील हॉटेल, उपहारगृहांना आता २० टक्के गॅस पुरवठा होणार आहे. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी याबाबत (पान २ वर)

### पुढच्या आठवड्यापासून ५० टक्के वाटप

केंद्र सरकारकडून काल एक पत्र राज्य सरकारला प्राप्त झालेलं आहे. त्या पत्राद्वारे भारत सरकार पेट्रोलिय आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाकडून व्यापाराच्या वाटपाबाबत सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेश यांना सूचना दिल्या आहेत. १८ मार्चच्या केंद्र सरकारच्या पत्राप्रमाणे विस्तारासाठी व्यवसाय सुलभता सुधारण्याच्या आधारे राज्याला आधीच सुरुवातीला २० आणि नंतर १० असे ३० टक्के वाटप मंजूर करण्यात आले आहे. आता २३ मार्चपासून पुढील सूचना येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण वाटप ५० टक्के होईल, असं मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं.

# जैन समाजाची अहिंसेची परंपरा समाजासाठी प्रेरणादायी : उपराष्ट्रपती राधाकृष्णन

वृत्तसंस्था । नव दिल्ली

**जैन समाजाने समाजसेवा, दानधर्म, अहिंसा आणि त्याग या मूल्यांवर आधारित कार्यातून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला असल्याचे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. लोकभवन येथील दरबार हॉलमध्ये संपन्न झालेल्या ६४ व्या जैन दीक्षा समारंभप्रसंगी ते बोलत होते.**



यावेळी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन म्हणाले, जैन समाज देशभरात विविध माध्यमांतून समाजहिताचे कार्य करीत असून, सेवा हीच जैन धर्माची ओळख आहे. ६४ जणांनी दीक्षा स्वीकारणे ही बाब अत्यंत प्रेरणादायी असून, त्यातून संयम, साधेपणा आणि आध्यात्मिकतेचा (पान २ वर)

## संपादकीय

### दबाव वाढतोय

पश्चिम आशियातील संघर्षामुळे लाखो भारतीय अडकले आहेतच, मात्र देशांतर्गतही इंधन संकट वाढत जाण्याची चाहूल लागली आहे. सर्व भारतीयांचे संरक्षण केले जाईल अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. त्यांनी पुन्हा एकदा आत्मनिर्भरता या मुद्द्यावर भर दिला आहे. तेल आणि गॅसच्या संदर्भातील स्थिती सामान्य असल्याचे सांगण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जातो आहे. तथापि, त्यावर पूर्ण विश्वास ठेवावा अशी स्थिती नाही. विशेषत: व्यावसायिक वापरासाठीच्या गॅसचा पुरवठा एकतर अत्यंत नगण्य झाला आहे किंवा ठप्प झाला आहे. विविध बाजूंनी होणारा खऱ्या-खोट्या बातम्यांचा मारा आणि युद्ध थांबण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नसल्यामुळे कदाचित परिस्थिती हाताबाहेर तर जाणार नाही ना अशी शंका डोकावू लागली आहे. त्याचा परिणाम अर्थातच दबाव वाढण्यात होतो आहे. खाडी युद्धात अडकलेल्या कोणत्याही भारतीयाला वाऱ्यावर सोडले जाणार नाही असे म्हणणाऱ्या सरकारवर विश्वास आहे व सरकार ते कर्तव्य चोख बजावेलही याबाबत शंका नाही. प्रश्न आहे तो आता देशांतर्गत जी समस्या निर्माण होणार आहे विशेषत: स्वयंपाकाच्या गॅसची त्याबाबत सरकार काय करू शकणार आहे याचा. केवळ बोलून अथवा सांगून अथवा दिलासा देऊन संपवता येण्यासारखा हा विषय नाही याची सरकारलाही कल्पना आहे. दिवसागणिक युद्धाच्या वातावरणामुळे जी अनिश्चितता वाढत चालली आहे त्याची छाया आता केवळ सरकारमधील लोकांच्याच नव्हे, तर सर्वसामान्यांच्याही चेहऱ्यावर उमटताना दिसते आहे. संघर्ष लवकरच मिटला नाही आणि इंधनपुरवठ्याची साखळी पूर्ववत सुरू झाली नाही तर काय ही ती चिंता आहे. तसे झालेच तर पर्यायी व्यवस्था आणि उपाय काय आहेत हे अजुनही अनुत्तरित आहे. देशात कशाचीच कमतरता नसल्याचे सांगण्यात येते आहे. पण बहुतेक महानगरांमधील चित्र पुरेसे बोलके आहे. अनेक ठिकाणी व्यावसायिक गॅसचा पुरवठा थांबला आहे. त्यांच्याकडे जी तजवीज होती त्यावर त्यांनी आजपर्यंतचे म्हणजे आठ- दहा दिवस ढकलले. पुढे काय हा प्रश्न हॉटेल व्यावसायिकांसमोर आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने एलपीजीचे उत्पादन वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. रशियाकडून तीन कोटी बॅरल कच्चे तेल खरेदी केले गेले आहे. अर्थात या मागच्या आठवड्यातील घडामोडी आहेत. त्यानंतर तीन जहाजे भारताच्या गुजरातमध्ये दाखल झाली असली तरी हे फार आश्वासक असल्याचे आज म्हणता येऊ शकत नाही.होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्यामुळे अन्य मार्गानेही तेल मागवण्याचा प्रयत्न केला जातो आहे. इतरही धावपळ सुरू असली तरी एक गोष्ट समजण्यासारखी आहे की युद्धाची व्याप्ती ज्या प्रमाणात वाढली आहे त्याचा प्रभाव कुठल्या न कुठल्या स्वरूपात पडणार आहेच व त्याची झळही सोसावी लागणार आहे. भारतासारखे जे देश आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त आयातीवरच अवलंबून आहेत त्यांच्यासाठी हा परीक्षेचाच काळ आहे.आता आत्मनिर्भर होण्याच्या केवळ चर्चा करून भागणार नाही, तर भविष्यासाठी तजवीज करण्याकरता पुढाकारही घ्यावा लागेल. सरकार खुलेपणाने मान्य करत नसले अथवा करू शकत नसले तरी चिंतेच्या रेषा चेहऱ्यावर दिसू लागल्या आहेत. केंद्राच्या सूचनेनुसार शुद्धीकरण प्रकल्प आपल्या पूर्ण क्षमतेने काम करत आहेत. असे असूनही गॅसचे संकट आवाक्यात अथवा आटोक्यात आलेले नाही. कटात पोळले जाणाऱ्यांचा जसा एक वर्ग असतो तसा त्याच काळात आपली पोळी भाजणाऱ्यांचाही म्हणजे संकटाचाही व्यापार करणारा एक वर्ग असतो. अनिश्चिततेच्या काळात त्यांचे फावतेच. पुरवठा सुरळीत राहावा यासाठी आवश्यक नियम लागू केले गेले आहेत. तथापि, ठिकठिकाणी छापेही टाकले जात आहेत.

# ईदनिमित्त सामूहिक नमाज अदा, विश्वशांतीसाठी प्रार्थना



प्रतिनिधी । धुळे

**शहरासह जिल्ह्यात रमजान ईद मोठ्या उत्साहात आणि बंधुभावाने साजरी करण्यात आली. यानिमित्त पांझरा नदी किनारी असलेल्या ईदगाह मैदानासह दाता सरकार व विविध मशिदींमध्ये सामूहिक नमाज अदा करण्यात आली. याप्रसंगी विश्वशांतीसाठी प्रार्थना करण्यात आली.**



नमाज पठणानंतर सर्व बांधवांनी एकमेकांना गळाभेट देत ईद मुबारक म्हणून शुभेच्छा दिल्या. पांझरा किनारी असलेल्या अंजान शाहबाबा दर्गाबाहेर मुस्लिम बांधवांना उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार उपासे, शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक दीपक पाटील यांनी गुलाबपुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

शहरातील पांझरा किनारी असलेला ईदगाह मैदान, जामा मशिद, नुरानी मशिद, दाता सरकार, वडजाई रोड, चाळीसगाव रोड, देवपूर, मोगलाईसह सर्वच मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा केली.

नमाज पठणानंतर हिंदू-मुस्लिम बांधवांनी परस्परांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच विविध मुस्लिम संघटनांतर्फे शिरखुर्मा वाटप करण्यात आले. ईदनिमित्त बाजारपेठेतही मोठी उलाढाल झाली. मुस्लिम बांधवांनी खरेदीसाठी मोठ्याप्रमाणावर गर्दी केली. पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# बालनाट्य प्रशिक्षण शिबिराचा समारोप

## ● बालनाट्य प्रशिक्षण शिबिरामुळे जिल्ह्याचे नाव नाट्य क्षेत्रात उंचावेल : चंद्रशेखर चव्हाण

प्रतिनिधी । नंदुरबार

**बालनाट्य प्रशिक्षण शिबिरामुळे प्रशिक्षित बालकलावंत तयार होऊन त्यांचा विकास होईल व भविष्यात नंदुरबार जिल्ह्याचे नाव नाट्य क्षेत्रात उंचावेल, असे मत संगीत दिग्दर्शक चंद्रशेखर चव्हाण यांनी व्यक्त केले. ते नंदुरबार येथे राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत बालनाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होते.**

या प्रशिक्षण शिबिराच्या समारोपाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संगीत दिग्दर्शक चंद्रशेखर चव्हाण, यांच्यासमवेत सिनेअभिनेते रणजीत राजपूत, मौखिक साहित्य परिषदेचे संयोजक भीमसिंग वळवी, नाट्यकर्मी मनोज सोनार, बालरंगभूमी परिषद नंदुरबार जिल्हा शाखेचे अध्यक्ष राजेश जाधव, प्रशांत कोटेचा, समन्वयक नाट्यकर्मी नागसेन पेंढारकर आदी उपस्थित होते. रणजीत राजपूत म्हणाले की, बालनाट्य प्रशिक्षण म्हणजे बालकलावंतांसाठी महत्त्वाचा पाया आहे. यातून कलावंतांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळाले असेल यात शंका नाही.

येथील हॉटेल डी.एस. के रेसिडेन्सीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत ६ ते १५ या वयोगटातील नवोदित बालकलाकारांसाठी बालरंगभूमीचे जतन व संवर्धन करून नवीन बालकलाकार तयार व्हावेत, या हेतूने सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक कार्य संचालक श्रीराम पांडे यांच्या नियोजनाखाली या १० दिवसीय बालनाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या बालनाट्य प्रशिक्षण शिबिरात सुजय भालेराव (नेपथ्य), योगेश शुक्ल (रंगभूषा व वेशभूषा), आसेफ अन्सारी (प्रकाशन योजना), राहुल खेडकर (उत्स्फुर्त अभिनय), सिने अभिनेत्री वैशाली दाभाडे (अभिनय व आवाज जोपासना), अमजद सय्यद (दिग्दर्शन व कलात्मकता), प्रकाश पारखी (लेखन, एकपात्री, नाट्यछटा), मनोज सोनार (तालीम, संधिकता व एकाग्रता) यांनी प्रशिक्षण दिले. सदर शिबिरात एकूण बाल कलावंतांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी सर्व बाल कलाकारांनी तीन लघु नाटिकांचे प्रभावी सादरीकरण करून रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

याप्रसंगी जिया फातेमा अन्सार शेख, श्रवण स्वप्निल वाणी, सर्वेश गोविंद सूर्यवंशी, वेदांत दिलवरसिंग ठाकरे, मेहक महेश नवले, रुजल महेश गुरव, पल्लवी भरत पाटील या बाल कलाकारांनी व पालकांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्व सहभागी बालकलाकारांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक नागसेन पेंढारकर यांनी केले. सूत्रसंचलन रेवा रविंद्र पवार व अथर्व किरण दाभाडे यांनी केले. आभार युक्ता धिरज खैरनार या बाल कलाकाराने केले.



# साक्री ग्रामीण रुग्णालयातील अधिकाऱ्यांची कानउघाडणी

## जिल्हाधिकाऱ्यांच्या पाहणीत रुग्णालयातील बेफिकिरी, गैरसोयी उघड

प्रतिनिधी । धुळे

**तालुक्यात अवकाळी व गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी अचानक ग्रामीण रुग्णालयाला भेट देत पाहणी केली. त्यात रूग्णालयातील बेफिकिरी, गैरसोयी समोर आल्या.**

रुग्णालयात स्वच्छतेचा अभाव, अपुरी यंत्रसामग्री, बंद अवस्थेतील प्रथमोपचार कक्ष, जीर्ण छत, रुग्णांना पिण्याच्या पाण्याचीही सोय नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे जिल्हाधिकारी विसपुते यांनी अधिकाऱ्यांची कानउघाडणी करीत तत्काळ दुरूस्तीसह आवश्यक त्या कार्यवाहीचे आदेश दिले. तसेच रुग्णालयातील जेवण व्यवस्थेत अनियमितता आढळून आल्याने संबंधित ठेकेदारा ब्लॅक लिस्ट करण्याचेही निर्देश देण्यात आले. या पाहणीवेळी प्रांताधिकारी रोहन कुवर, तहसीलदार साहेबराव सोनवणे आदी उपस्थित होते. ३ यानंतर जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहाला भेट दिली. वसतिगृहात पिण्याच्या पाण्याची अपुरी सोय असून टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याची वस्तुस्थिती समोर आली. शाळा, महाविद्यालये दूर असल्यामुळे विद्यार्थिनींना सहा किमी पायपीट करावी लागत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या. लायब्ररी व स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तकांची सुविधा उपलब्ध करून देण्याची विद्यार्थिनींनी यावेळी मागणी केली आहे.



## पान १ वरुन

पान १ वरुन

### शाळांमध्ये मोबाईल बंदीचा......

झाला आहे. तर फ्रान्ससारख्या देशात प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये आधीच कडक नियम लागू करण्यात आले असून, आता तिथे अधिक स्पष्ट कायदे बनवण्याची प्रक्रिया सुरू आहे. परंतु सर्वच देशांनी सरसकट देशव्यापी बंदी घातलेली नाही. एस्टोनिया, सर्बिया, पोलंड आणि इंडोनेशिया यांसारख्या देशांनी शाळा प्रशासनाला स्वतःचे नियम बनवण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. अमेरिकेमध्ये अद्याप कोणतीही देशव्यापी बंदी नसली तरी, ३९ राज्यांनी शाळांमध्ये फोन वापरावर निर्बंध आणणारे कायदे किंवा नियमावली तयार केली आहे. अनेक ठिकाणी अपंगत्व किंवा आजार असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अपवाद वगळता, उर्वरित वेळ फोन बंद ठेवणे किंवा जमा करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

### अशोक खरात प्रकरणावर......

सामाजिक दबावामुळं महिला एकदम पुढे येत नाहीत. ज्यामुळं जे पीडित आहेत त्यांना धीर देऊन, त्यांच्या कुटुंबीयांना धीर देऊन त्यांना समोर आणण्याचा प्रयत्न सुरू असून त्यात काही महिला प्रतिसादही देत आहेतफ्र अशीही माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर तपासणी आणि कारवाई सुरू असून, डीजी यामध्ये लक्ष घालत असून, नाशिक पोलीस आयुक्त आणि एसआयटी मिळून हे काम पूर्ण करताहेत, असे म्हणत जर कोणाकडे या संदर्भात काही पुरावा असेल तर निश्चित आणून द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

### महाराष्ट्र केसरी गटात......

सर्वात सनसनाटी निकाल नोंदवला. चपळ कुस्ती करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या जयने लढत सुरू होताच पृथ्वीराजला स्थिरावण्याची संधीच दिली नाही. पृथ्वीराजचा आक्रमक सुरुवात करण्याचा प्रयत्न फसला आणि पायात अडकून खाली पडला. ही संधी जयने अचूक साधली. पृथ्वीराजवरील पकड घट्ट करत कुस्ती धोकादायक स्थितीत नेत त्याला चीतपट केले. गादी विभागातील अंतिम लढतीत त्याची गाठ आता नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरशी होईल. मध्यंतरापर्यंत संथ झालेल्या लढतीत हर्षवर्धनने उत्तरार्धात पृथ्वीराजचा एकेरी पट काढण्याचा डाव परतवून लावला आणि त्याच स्थितीत त्याच्यावर ताबा मिळवत गुण वाढवत ६-२ असा विजय मिळविला. माती विभागातील उपांत्य फेरीत दोन्ही निकाल अपेक्षित लागले. बाहुबली म्हणून प्रसिद्ध असलेल्या महेंद्र गायकवाडने आपली ताकद दाखवून देत सोलापूरच्या रवीराज चव्हाणचा भारंदाज डावावर झटपट गुण वसूल करत पहिल्याच फेरीत १०-० अशा तांत्रिक आघाडीवर विजय मिळवून अंतिम फेरी गाठली. तमाम कुस्ती शौकिनांचा लाडका असलेल्या सिकंदर शेखने नंतर अहिल्यानगरच्या सुदर्शन कोतकरचे आव्हान अगदी आरामात गुणांवर ४-३ असे परतवून लावले. निक्रिय कुस्तीची ताकीद मिळाल्यावर तीस सेकंदाच्या कालावधीत अगदी अखेरच्या सेकंदाला सुदर्शनने गुण वसूल केला आणि पाठोपाठ ताबा मिळवत दोन गुणांची कमाई करून मध्यंतराला ३-० अशी आघाडी कायम राखली होती.

### आता डिझेल प्रतिलिटर......

समोर आले असून, नव्या तंत्रज्ञानामुळे ही गळती थांबवली जाणार आहे. दरम्यान, एसटीच्या २५१ डेपो आणि ६०० हून अधिक बस स्थानकांवर डिजिटल जाहिरातींद्वारे पुढील पाच वर्षांत सुमारे २५० कोटी रुपयांचा महसूल मिळवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तसेच, ऊर्जा खर्च कमी करण्यासाठी डेपो आणि स्थानकांवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारले जाणार असून, यातून दरवर्षी १० ते १५ कोटी रुपयांची बचत होण्याची शक्यता आहे.

### जैन समाजाची अहिंसेची......

संदेश समाजाला मिळतो. भगवान महावीरांनी दिलेला अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकांतवादाचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरत असल्याचेही त्यांनी म्हटले. संवाद, सहिष्णुता आणि करुणा या मूल्यांमधूनच शांतता आणि शाश्वततेचा मार्ग सापडू शकतो. तमिळनाडू आणि जैन धर्माचे ऐतिहासिक नाते अधोरेखित करताना उपराष्ट्रपतींनी जैन समाजाने साहित्य, संस्कृती आणि ज्ञानसंवर्धन क्षेत्रात दिलेल्या योगदानाचे कौतुक केले.

### राज्यातील हॉटेल, ......

माहिती दिली आहे. राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया-दुग्ध व्यवसाय, राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स यांच्यासाठी २० टक्के एलपीजी पुरवठा करण्याचे केंद्राचे निर्देश असल्याची माहिती अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.

## दोंडाईचात धाडसी घरफोडी

प्रतिनिधी । दोंडाईचा

शहरातील सिंधी कॉलनी परिसरात मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत लॉकरमधील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ६ लाख ९ हजार २०० रुपयांचा ऐवज लंपास केला.

दिलीप संगतमल वाधवाणी (वय ५७ रा. नैनादवाली माताची नगर, शहादा रोड, सिंधी कॉलनी, दोंडाईचा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, काल दि. २० रोजी रात्री कुटुंबीय धार्मिक कार्यक्रमासाठी बाहेर गेले असताना ही चोरी झाली.

# भररस्त्यात भरधाव ट्रक उलटल्याने चालक जखमी

प्रतिनिधी । पाचोरा

**शहरातील मुंबई-नागपूर महामार्गावरुन भडगावकडून पहुरकडे जात असताना मोटारसायकलला वाचविण्याच्या प्रयत्नात भरधाव ट्रक डिव्हायडरवरील पोलला जोरदार धडक देत विरुद्ध दिशेने येणाऱ्या रोडावर उलटला. विरुद्ध दिशेच्या रोडने येणाऱ्या दोन मोटारसायकलस्वार थोडक्यात बचावले व मोठी जीवितहानी टळली आहे.**



पाचोरा शहरातील बायपासवरुन दि.१९ मार्च रोजी दुपारी ११.३० ते १२ वाजेदरम्यान भडगाव-पाचोराकडून पहुरकडे जाणारा एम.एच.१९ सी.एक्स. ४६९९ क्रमांकाचा ट्रक हा विकास कॉलनीकडून १ मोटारसायकलस्वार अचानक रोडाला लागण्याच्या उद्देशाने समोर आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात ट्रक डिव्हायडरवरील पोलला जोरदार धडक देत विरुध्द दिशेने उलटला. ट्रकचा वेग जोरात असल्याने ट्रकचालक राजू पाटील जखमी झाले होते. त्यांना तत्काळ पो.कॉं. दीपक पाटील यांनी गाडीच्या बाहेर काढले. घटनास्थळी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष सचिन सोमवंशी, पी.एस.पाटील यांनी भेट देऊन दुर्घटनाग्रस्त ट्रकची पहाणी केली. ट्रक ऑईलने भरलेला होता. शहरातील बायपासवर जड वाहनांनी हळू चालले पाहिजे, असा सूर बघ्यांचा होता.

छोटे-मोठे अपघात नित्याचेच पाचोरा शहराच्या बाहेरुन येणाऱ्या मुंबई-नागपूर महामार्गावरुन भडगाव-पाचोराकडून जळगाव, जामनेरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठ्याप्रमाणात कॉलनी परिसर असून कॉलनी परिसर नागरिक आपली वाहने मेनरोडावर नेत असताना महामार्गावरुन भरधाव येणाऱ्या वाहनांमुळे नेहमीच छोटे-मोठे अपघात होत असतात. यात अनेक जखमी झाले तर काहींनी आपला जीव गमावलेला आहे.

# शबरी आवास योजनेच्या ५५ लाभार्थ्यांना दिली बांधकाम परवानगी

प्रतिनिधी । धुळे

**अनुसूचीत जमातीच्या अल्प उत्पन्न गटातील नागरीकांना हक्काची पक्की घरे देण्यासाठी धुळे महानगरपालिकेमार्फत आयोजित केलेला हा उपक्रम निश्चीतच अभिनंदनीय आहे याचा शहरातील सर्व लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापौर मायादेवी परदेशी यांनी आज शहरी शबरी आवास योजने अंतर्गत असलेल्या बांधकाम परवानगी शिबिराप्रसंगी व्यक्त केले.**



दि. २० मार्च २०२६ शुक्रवार रोजी सकाळी १० ते ३ या वेळात धुळे महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीच्या प्रांगणात सदर शिबिर आयोजित करण्यात आलेले होते. या शिबीराचे आयोजन आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते. शिबिराचे उदघाटन उपस्थित लाभार्थ्यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. धुळे महानगरपालिकेमार्फत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या शहरी शबरी आवास घरकुल योजना राबविण्यात येत आहे. यासाठी प्रात्र लाभार्थ्यांना चार टप्यात रुपये २.५० लक्ष मात्र अनुदान घरकुल बांधण्यासाठी शासनामार्फत देण्यात येते. आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत यातील एकूण ९० लाभाथर्थ्यांना मान्यता देण्यात आलेली आहे. यातील ५७ लाभार्थी निश्चीत झालेले आहे. तथापी सदर लाभार्थ्यांकडे ८-अ चा उतारा असल्याने व लाभार्थ्यांकडे असलेली जागा गावठाण भागात येत असल्याने बांधकाम परवानगी देण्यास अडचणी निर्माण होत होत्या. तथापी शासनामार्फत नविन निर्णय पारित झालेला आहे. सदर निर्णयानुसार ३ वर्षाच्या मालमत्ता कर पावतीच्या आधारे लाभार्थ्यांना पात्र ठरविता आले आहे. आज झालेल्या शिबिराप्रसंगी एकूण ५५ लाभार्थ्यांची कागदपत्रे पडताळणी करुन बांधकाम परवानगी देण्यात आली व लवकरच त्यांना अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात येणार आहे. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी नगरसेविका वंदना भामरे, रंगनाथ ठाकरे सहा. संचालक नगररचना भटू पवार, उपायुक्त मनोज वाघ, शहर अभियंता श्री चंद्रकांत उगले, उपअभियंता कमलेश सोनवणे, प्रकाश सोनवणे कनिष्ठ अभियंता भुषण ढवळे, चंदा शेख महादेव परदेशी व नगररचना विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी पंतप्रधान आवास योजना कक्षातील तांत्रीक तज्ञ प्रमोद दिलीप सोमवंशी, रजत अग्रवाल, अंजली येवले यांनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## महापौरांच्या संतापाचा 'इफेक्ट'

# लेवा बोर्डिंग सभागृहाबाहेरील कचरा २० मिनिटांत हटवला

## आरोग्य विभागाला दिली कडक ताकीद

प्रतिनिधी । जळगाव

**शहराच्या मध्यवर्ती भागातील लेवा बोर्डिंग सभागृहाबाहेर साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यावरून महापौर दीपमाला काळे यांनी संताप व्यक्त करताच महापालिकेचा आरोग्य विभाग अक्षरशः धावपळ करत जागा झाला. तब्बल सहा–सात तासांपासून पडून असलेला कचरा अवघ्या २० मिनिटांत हटवण्यात आल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य आणि समाधान व्यक्त होत आहे.**

शनिवारी सकाळी स्वच्छता कर्मचाऱ्यांनी लेवा बोर्डिंग परिसरात नियमित साफसफ ाई केली. मात्र, गोळा केलेला कचरा उचलण्याऐवजी तो सभागृहाच्या मुख्य





प्रवेशद्वारासमोरच ढिगाऱ्याच्या स्वरूपात टाकून कर्मचारी निघून गेले. सकाळपासूनच या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली होती. स्थानिक नागरिकांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कचरा तात्काळ उचलण्याची विनंती केली होती, मात्र दुपारी १ वाजेपर्यंत त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. दरम्यान, लेवा बोर्डिंग सभागृहात आयोजित प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी महापौर दीपमाला काळे दुपारी १ वाजण्याच्या सुमारास येथे पोहोचल्या. प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे ढीग पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नागरिकांनी त्यांना परिस्थितीची माहिती दिल्यानंतर महापौरांनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या स्वीय सहाय्यकांमाफ ॅत महापालिकेच्या आरोग्य विभागाला तातडीने कचरा हटवण्याचे आदेश दिले. महापौरांच्या आदेशानंतर आरोग्य विभाग खडबडून जागा झाला. काही वेळातच स्वच्छता कर्मचारी आणि कचरा उचलणारे वाहन घटनास्थळी दाखल झाले. अवघ्या २० मिनिटांत संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. या तात्काळ कारवाईमुळे स्थानिक नागरिकांनी महापौरांचे आभार मानत समाधान व्यक्त केले. या घटनेनंतर महापौरांनी आरोग्य विभागाला कडक शब्दांत ताकीद दिली. शहरातील साफ सफाई वेळेवर आणि नियोजनबद्ध पद्धतीने झाली पाहिजे, केवळ कचरा झाडून ढिगारे करून सोडणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच साफसफाईनंतर एका तासाच्या आत कचरा उचलणे बंधनकारक असल्याचे निर्देश त्यांनी दिले. या घटनेमुळे कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये चांगलाच धाक निर्माण झाला असून भविष्यात अशा प्रकारांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## 'राजा रयतेचा' महानाट्य म्हणजे शिवधनुष्यच : नेवे

### रोटरीच्या मुलाखतीत उलगडली यशोगाथा




प्रतिनिधी । जळगाव

**१५३ कलावंतांसह छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील वस्तुनिष्ठ असलेले राजा रयतेचा या महानाट्याची निर्मिती व सादरीकरण म्हणजे शिवधनुष्यच आहे असे शिवरत्न प्रतिष्ठानचे प्रमुख व महानाट्याचे निर्माते जयवर्धन नेवे यांनी प्रतिपादन केले.**

गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये रोटरी क्लब जळगावच्या ३५ व्या साप्ताहिक सभेत झालेल्या प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. यावेळी अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, संवाद सचिव पंकज व्यवहारे, प्रोग्राम कमिटी चेअरमन स्वाती ढाके यांची प्रमुख उपस्थिती होती. रोटरक्ट क्लब मध्ये सक्रिय होतो. नंतर रोटरीमुळे आत्मविश्वास वाढला, वेगळी ओळख मिळाली. पुढे शिवरत्न प्रतिष्ठानचे कार्य सुरू करून महानाट्य निर्मितीची कल्पना सुचली असे जयवर्धन नेवे यांनी प्रारंभी सांगितले.

पुढे त्यांनी बोलताना घरात चार हजार पुस्तके व वडील स्व. दादा नेवे यांच्यासारखा अभ्यासक मार्गदर्शक म्हणून लाभल्यामुळे सुरुवातीला शिवराज्याभिषेक सोहळा व नंतर राजा रयतेचा या महानाट्यापर्यंतची सर्जनशील प्रवासाची कहाणी सांगितली. इतिहास आणि कल्पनाशक्ती यांचे संतुलन साधताना वस्तुनिष्ठ इतिहासच सादर करावा लागतो. कार्यक्रमात महानाट्यातील कलावंत स्वप्निल नेवे, भूषण नेवे, विजय नेवे, आदित्य वाणी, निलेश चौधरी आणि स्वाती ढाके यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सादरीकरणापूर्वी भीतीनंतर उत्साह, असे संमिश्र भावना असते, असे ते म्हणाले. निधी संकलन व रंगमंच उभारणीच्या विविध अनुभवांसह प्रेक्षकांच्या हृदयस्पर्शी प्रतिक्रिया देखील त्यांनी सांगितल्या. प्रत्येक घरात छत्रपतींचे एक तरी पुस्तक असावे. त्याचे वाचन करावे. युवकांनी केवळ एक दिवस जयंती साजरी न करता महाराजांचा एक तरी गुण आदर्श म्हणून घ्यावा, असे नेवे म्हणाले. हे महानाट्य केवळ मनोरंजन नसून समाज मनाला प्रेरणा देणारी चळवळ आहे. पैसे कमविणे हे आमचे उद्दिष्ट नाही. समाजात विचारांची जागृती करणे हे खरे ध्येय आहे. शिवाजी महाराजांचे नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्व पोहोचविण्याचा या महानाट्याद्वारे आमचा प्रयत्न आहे असे त्यांनी सांगितले. राजा रयतेचा हे नाटक माझ्यासाठी केवळ सादरीकरण नसून माझ्या श्वास आहे. हा प्रवास अविश्वासनीय आहे. महानाट्य संधी मिळाल्यास शिवा काशीद यांची भूमिका साकारण्याची इच्छा ही नेवे यांनी व्यक्त केली. जिजामातांची भूमिका साकारणाऱ्या स्वाती ढाके यांनी रोटरीच्या परिचयातून ही अभिनयाची संधी मिळाली. त्यासाठी अनेक पुस्तके वाचून व मालिका पाहून तयारी केली. या भूमिकेमुळे जिजामातांची जीवन किती कठीण होते, याची जाणीव झाली. वैयक्तिक आयुष्यात देखील या भूमिकेचा फायदा झाला. रसिकांनी राष्ट्रधर्मासाठी तुमचा जन्म झाला आहे ही व्यक्त केलेली प्रतिक्रिया मोलाची आहे असे सांगितले.

## थोडक्यात

### भुसावळ स्पोर्ट्स अॅण्ड रनर्स असोसिएशनचा स्तुत्य उपक्रम

**भुसावळ।** साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त असलेला गुढीपाडवा हा हिंदू तसेच मराठी वर्षाचा पहिला दिवस मानला जातो. याप्रसंगी बिसारा लेडीज इक्वलिटी रनचे आठवे ट्रेनिंग सेशन शहरातील कृष्णचंद्र सभागृहाच्या शेजारी उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रविण फालक होते. यावेळी सर्वप्रथम सकाळी ६ वाजता सर्व धावपटू महिला साडी, नऊवारी पातळ आदी पारंपारिक वेशभूषा करून मैदानावर हजर झाल्या. त्यानंतर वार्म अप व्यायाम प्रकार घेण्यात आला व त्यानंतर धावायला सुरुवात झाली.

### शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**पारोळा ।** तालुक्यातील नगाव येथे कर्जबाजारीपणाला कंटाळून ४० वर्षीय शेतकऱ्याने गळफास घेत आत्महत्या केली. सचिन भाऊसाहेब पाटील असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. सचिन पाटील हे शेती करून परिवाराच्या उदरनिर्वाह करीत होते. सततची नापिकी व हात उचलसह घेतलेल्या कर्जामुळे ते नेहमी विवंचनेत होते. नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलत त्यांनी दि.२१ रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास आपल्या शेताच्या बाजूला असलेल्या गोडाऊनच्या जिन्याला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. त्यांना पारोळा कुटीर रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पारोळा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### पालिकेकडून दिव्यांग विद्यार्थ्यांना किराणा साहित्य वाटप

**पारोळा ।** मराठी नववर्षारंभ आणि गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर पारोळा नगरपरिषदेने सामाजिक बांधिलकी जपत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्तुत्य उपक्रम राबविला. पाडव्याच्या पूर्वसंध्येला नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष तसेच नगरसेवक नगरसेविकांनी आपला एक दिवसाचा सभा आतिथ्य भत्ता दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देण्याचा निर्णय घेत त्यांना किराणा साहित्याचे वाटप केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात गोडवा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपनगराध्यक्ष अॅड. रोहन मोरे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात नगरपरिषद प्रशासनानेही सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यात आली.

## जैन इरिगेशन केळीच्या दोन नवीन जातींची रोपे टिश्यूकल्चर पद्धतीने तयार करणार

### केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर झाल्या सह्या

प्रतिनिधी । जळगाव

**केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत जळगावच्या जैन हिल्सवर भारतीय कृषी अनुसंधान परिषद– राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची आणि जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेड, जळगाव यांच्यामध्ये केळीच्या 'कावेरी वामन' व 'कावेरी पुवन' या दोन नवीन जातींच्या रोपांची टिश्यूकल्चर पद्धतीने निर्मिती करण्यासंबंधीचा सामंजस्य करार झाला.**

या कराराच्यावेळी जैन कंपनीचे अध्यक्ष अशोक जैन, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन, सह–व्यवस्थापकीय संचालक अजित जैन व अतुल जैन आणि राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर. सेल्व्हराजन उपस्थित होते. राष्ट्रीय केळी संशोधन केंद्रातर्फे डॉ. आर. सेल्व्हराजन आणि जैन इरिगेशनतर्फे टिश्यूकल्चर विभागाचे उपाध्यक्ष डॉ. अनिल पाटील व डॉ. के. बी. पाटील



यांनी करारावर सह्या केल्या. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे झालेल्या केळी चर्चासत्रात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत कराराच्या प्रतींचे आदान–प्रदान करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार स्मिता वाघ, केंद्रीय कृषी मंत्रालयाचे सहसचिव प्रियरंजन दास, महाराष्ट्र राज्याच्या कृषी आयुक्तालयातील फलोत्पादन संचालक अंकुश माने, आयसीएआरचे एडीजी डॉ. व्ही. बी. पटेल, जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. जैन इरिगेशन कंपनी आता जळगांवमध्ये 'कावेरी वामन' आणि 'कावेरी पुवन' या जातीच्या केळी रोपांची निर्मिती करून ती शेतकऱ्यांना पुरवणार आहे.

### या दोन्ही केळींच्या जातीची वैशिष्ट्ये

- कावेरी वामन ही जात ग्रॅन्ड नैन या केळीच्या जातीपासून भाभा अणु संशोधन केंद्र मुंबई येथे विकसीत करण्यात आली आहे. ही जात ट्रिपल अे या जीनोमिक गटातील असून ती सपाट भुभाग व चांगल्या निचऱ्याच्या जमिनीत उत्तम वाढते. झाड बुटक्या स्वरूपाचे असून उंची १५० ते १६० सें.मी. असते. खोडावर काळे–तपकिरी डाग दिसतात. झाडाचा आकार दंडगोलाकार असून घडाचे वजन १८ ते २५ किलो दरम्यान असते. पिकल्यावर फळे पिवळी होतात. गर क्रिम रंगाचा व चवीला गोड असतो. अतिसघन पद्धतीने या जातीची लागवड करता येते. झाडांना आधार द्यावा लागत नसल्यामुळे लागवड खर्चात १० टक्के बचत होते. वादळ–वाऱ्याचा प्रभाव असलेल्या व किनारी भागात लागवडीसाठी ही जात योग्य आहे. ११ ते १२ महिन्यात कापणीसाठी तयार होणारी ही जात वर्षभरात केव्हांही लावता येते. सरासरी उत्पादन हेक्टरी ५५ ते ६० टन येते.
- कावेरी पूवन ही जात लोकप्रिय अशा पूवन केळीच्या जातीपासून तयार करण्यात आली आहे. त्रिची येथील राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राने १५ वर्षे संशोधन करून ही जात विकसीत केली आहे. या जातीचे विशेष वैशिष्ठ म्हणजे ती विषाणूजन्य रोग व फुसारिअम विल्ट (मर रोग ) टीआर –१, टीआर –४ या अति घातक रोगाला प्रतिकारक असून स्थानिक पूवन जातीपेक्षा २० टक्के उत्पादन अधिक देते. या जातीचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे ती खारट व क्षाराच्या जमिनीतही उत्तम येते.

## पारोळा येथे चेट्रीचंड्र सिंधी दिवस उत्साहात

प्रतिनिधी । पारोळा

सिंधी समाजाचे आराध्य दैवत भगवान झुलेलाल यांची जयंती चेट्रीचंड्र सिंधी दिवस शहरातील ओत्तार गल्लीतील समाज मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सिंधी समाजाचे आराध्य दैवत भगवान झुलेलाल यांची जयंती चेट्रीचंड्र सिंधी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त समाजाच्या वतीने शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात सकाळी मंदिर परिसरात साफसफाई अभियान राबविण्यात आले.

## फैजपुरात 'राम नाम' जप दिंडी सोहळा

प्रतिनिधी । फैजपूर

पवित्र श्रीरामनवमीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही सकल हिंदु महिलांतर्फे 'राम नाम' जप दिंडी सोहळ्याचे आयोजन २६ मार्च रोजी आयोजित करण्यात आले आहे.

दिंडीत समाजातील सर्व माता–भगिनी, युवक–युवती व भाविक भक्तांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दिंडीचा कार्यक्रम गावातील श्रीराम मंदिरातून दि.२६ मार्च रोजी सकाळी ७ वाजता सुरू होईल. राम नाम घ्या, जीवन धन्य करा, या भावनेतून ही दिंडी काढली जात असून, सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजिका प्रज्ञा चौधरी यांनी केले आहे. दिंडी गावातील श्रीराम मंदिर येथून सुरुवात होईल, जुने हायस्कूल न्हावी दरवाजा, रथ गल्ली, होलेवाडा, लक्कडपेठ, कासार गल्ली, हनुमान मंदिराकडून सुभाष चौक, तेथून श्रीराम पेठ येथील श्रीराम मंदिराकडे जाईल, पुन्हा सुभाष चौक मार्गे खुशालभाऊ रोडवरून दिंडी गावातील श्रीराम मंदिरात समारोप होईल.

## मध्य रेल्वे नागपूरपर्यंत चालवणार विशेष गाड्या

प्रतिनिधी । भुसावळ

**मध्य रेल्वे प्रवाशांच्या वाढत्या गर्दीला लक्षात घेऊन लोकमान्य टिळक टर्मिनस–नागपूर आणि पुणे–नागपूर दरम्यान विशेष गाड्या चालवणार आहेत.**


लोकमान्य टिळक टर्मिनस–नागपूर दरम्यान, गाडी क्र. ०१०२१ ही ३ एप्रिल रोजी रात्री १२.५५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी दुपारी ३.४५ वाजता पोहोचेल. त्याचप्रमाणे गाडी क्र. ०१०२२ ही ३ एप्रिल रोजी नागपूर वरून रात्री ८ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ११.४५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनसला पोहोचेल. या गाड्यांचे थांबे ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे आहेत. पुणे–नागपूर दरम्यान, गाडी क्र. ०१४६७ ही ३ एप्रिल रोजी दुपारी ३.५० वाजता पुणे वरून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता नागपूर येथे पोहोचेल. गाडी क्र.०१४६८ ही ४ एप्रिल रोजी नागपूर वरून सकाळी ८ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पुणे येथे पोहोचेल. या गाड्यांचे थांबे उरुळी, दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, वर्धा येथे आहेत. गाड्यांची संरचना २ वातानुकूलित द्वितीय, ४ वातानुकूलित तृतीय, ८ शयनयान, ४ सामान्य द्वितीय आणि १ सामान्य द्वितीय श्रेणी–सह–गार्ड ब्रेक व्हॅन अशी आहे.

## श्रीराममंदिरात उद्या अभंग गायन सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**श्रीरामनवमी उत्सवानिमित्त राम पेठेतील जलग्रामदैवत श्रीराम मंदिरात मंगळवार, दि. २४ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता प्रभू श्रीराम जन्म अभंग गायन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भक्तिमय कार्यक्रमामुळे परिसरात धार्मिक वातावरणाची निर्मिती होणार असून भाविकांसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरणार आहे.**

या कार्यक्रमात वारकरी संप्रदायातील थोर संत संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज व संत सेना महाराज यांनी रचलेल्या श्रीराम



जन्मावरील अभंगांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

जळगावातील दुष्यंत जोशी, मकरंद देशमुख, दिलीप चौधरी, संपदा छापेकर, स्वरा पाठक, भागवत पाटील, मनीषा पापरीकर, नीळकंठ कासार, रेणुका जोशी व पुष्पा साकळीकर हे गुणी व अनुभवी कलाकार आपल्या सुरेल आवाजात अभंग गायन सादर करणार आहेत. तबल्यावर सुयोग गुरव, पखवाजावर श्रीधर जोशी तसेच व्हायोलिनवर स्वरा पाठक यांची साथ लाभणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन सुचिता नेवे करणार आहेत.

या आगळ्यावेगळ्या भक्तिमय उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी तसेच ग्रामदैवत प्रभू श्रीरामांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थानचे गादीपती ह.भ.प. मंगेश महाराज जोशी व विश्वस्त मंडळींनी केले आहे.

# सावित्रीबाई फुले पुरस्कार निवेदिता ताठे यांना प्रदान

## सावित्रीबाई फुले यांची मूर्ती, शाल, श्रीफळ, एक लाख रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत दिला जाणारा २०२३–२४ व २०२४–२५ या वर्षाचा ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार जळगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या निवेदिता सुनील ताठे यांना वितरण सोहळा १७ मार्च रोजी नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ चर्चगेट मुंबई येथील एसएनडिटी महिला विद्यापीठाच्या पाटकर दीक्षांत सभागृहात प्रदान करण्यात आला.**

स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि महिला सबलीकरण क्षेत्रात निरलस कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला. पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.चंद्रकांत (दादा) पाटील हे होते. प्रमुख अतिथी म्हणून अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री ना.छगन भुजबळ, तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव, वेणुगोपाल रेड्डी आणि एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सेवावृत्तीचा



वारसा पुढे नेणाऱ्या महाराष्ट्राच्या सहा महसुली विभागातील निवडक ११ महिलांना मान्यवरांच्या हस्ते २०२३–२४ व २०२४–२५ या वर्षीचे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा नाशिक विभागातील ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार, २०२३–२४ चा पुरस्कार जळगाव जिल्ह्यातील निवेदिता सुनिल ताठे यांना प्रदान करण्यात आला.

सावित्रीबाई फुले यांची मूर्ती शाल, श्रीफळ व एक लाख रुपयांचा धनादेश असे पुरस्काराचे स्वरूप आहे. निवेदिता ताठे या स्त्रीभ्रूणहत्या, सर्व शिक्षा अभियान, महिलांसाठी सामाजिक परिवर्तनाचे कार्य, बालविवाह तसेच अत्याचार पीडित महिलांना मार्गदर्शन, समुपदेशन अशा प्रश्नावर मागील अनेक वर्षांपासून काम करीत आहेत. त्यांचे विविध सामाजिक संस्थांकडून अभिनंदन होत आहे. सोहळ्यास प्राचार्य, संचालक, अध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी,विद्यापीठाचे अधिकारी ,कर्मचारी आणि एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेक आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळानकर यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे यांनी केले. जळगाव जिल्ह्यात हा पुरस्कार मिळाल्यानंतर निवेदिता ताठे यांना विविध संस्थांकडून सन्मानित करण्यात आले आहे.

# मतदार यादी अद्ययावत करण्याचा प्रशासनाने घेतला निर्णय

## २२ ते २५ मार्च दरम्यान 'एसआयआर मॅपिंग'चे काम मिशन मोडवर

प्रतिनिधी । चोपडा

**निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार, मतदार यादीतील अचूकता वाढवण्यासाठी आणि मतदारांच्या सोयीसाठी एसआयआर मॅपिंग ही मोहीम आता तीव्र करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, येत्या दि.२२ मार्च ते २५ मार्च या कालावधीत सर्व बीएलओंना हे काम 'मिशन मोड'मध्ये पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**




एसआयआर मॅपिंगद्वारे प्रत्येक मतदाराचे घर आणि त्याचे संबंधित मतदान केंद्र यांचे भौगोलिक स्थान निश्चित केले जाते. सध्या २०२४ मतदार यादीतील नावे २००२ च्या मतदार यादीतील नावांशी मॅपिंग बीएलओ मार्फत करण्यात येत आहे. ज्या मतदारांची नावे २००२ च्या यादीत नाहीत परंतु २०२४ च्या यादीत आहेत. अशा मतदारांना आपल्या आई-वडील किंवा आजोबा यांच्या २००२ मधील नावांची माहिती द्यावी लागणार आहे. तसेच मतदारांचे मतदार यादीतील अस्पष्ट फोटो किंवा नावातील किंवा अन्य दुरुस्त्या, तसेच दुबार मतदार, मृत मतदार, स्थलांतरित मतदार यांचे नावे मतदार यादीतून कमी करणे, अशा सर्व प्रकारची कार्यवाही यामुळे मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधणे सोपे होणार असून मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यास मदत मिळणार आहे.

**ठळक मुद्दे :**

- कालावधी: २२ मार्च ते २५ मार्च २०२६.
- सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि बीएलओ यांचा सक्रिय सहभाग.
- प्रत्येक घराचे मॅपिंग करून मतदार यादीतील पारदर्शकता वाढवणे.

**प्रशासकीय ताकीद** – दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत.

या मोहिमेदरम्यान बीएलओ आपल्या घरी आल्यास त्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, सदर आढावा बैठकीत भाऊसाहेब थोरात (तहसीलदार), रामनिवास झंवर (मुख्याधिकारी), सुधाकर पाटील (नायब तहसीलदार), संजय मिसर (उपमुख्याधिकारी) आणि संदीप पाटील सर यांनी सर्व बीएलओ आणि संबंधित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. कामात अचूकता राहावी आणि विहित मुदतीत उद्दिष्ट पूर्ण व्हावे, यासाठी या अधिकाऱ्यांकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे.

### रेल्वे स्थानकावर अनोळखी प्रौढाचा मृतदेह आढळल्याने खळबळ!

प्रतिनिधी । जळगाव

येथील रेल्वे स्थानकावरील नवीन दादऱ्याखाली २१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास एक ४५ वर्षीय अनोळखी पुरुष गंभीर आजारी अवस्थेत मिळून आला. स्टेशन मास्टर अरुण सोपान नाफडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित इसमाला तात्काळ उपचारासाठी जळगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना रात्री ७ वाजता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित करणण्यात आले आहे. रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर व्यक्तीचा मृत्यू हा दीर्घ आजारामुळे नैसर्गिकरीत्या झाला असल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसून येत आहे. सध्या मयताची ओळख पटलेली नसून, त्याचा मृतदेह जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील शवागारात ठेवण्यात आला आहे. ज्या कोणाला या वर्णनाच्या व्यक्तीबाबत माहिती असल्यास त्यांनी जळगाव रेल्वे पोलीस चौकीशी संपर्क साधावा, असे आवाहन रेल्वे पोलीस हवालदार सचिनकुमार जगदीश भावसार यांनी केले आहे.

# व्यसनाधीन लहान भावास मोठ्याने केले ठार

प्रतिनिधी । चोपडा


मयत


सुनील पाटील
आरोपी

**तालुक्यातील नारोद येथील सख्ख्या भावाने व्यसनाधीन भावाला गुळ नदीवरील के.टी.बंधाऱ्यावरून ढकलून गळा दाबून डोक्यात दगड मारून ठार केल्याची धक्कादायक घटना घडली. आई वडील व परिवारातील सदस्यांना दारूच्या नशेत तर्र होऊन वारंवार त्रास देण्याच्या प्रकाराला कंटाळून मोठ्या भावाने छोट्या भावाचा दुर्दैवी घात केला आहे. या घटनेने गावभर प्रचंड खळबळ उडाली असून अडावद ग्रामीण पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहिती अशी की, नारद येथील रहिवासी रोहन पानाचंद पाटील (वय २३वर्षे) हा घरात रोजच दारू पिऊन, गांजा ओढून नशेत धूत्त होत परिवारात धिंगाणा घालून मानसिक त्रास देत होता. तसेच जुगार खेळण्यासाठी पैसे दिले नाहीत तर आरडाओरडा करून भाऊ सुनील व त्यांच्या पत्नीच्या अंगावर धावून जात होता. या ज्याच्याला कंटाळून मोठा भाऊ सुनील याने मनात राग धरून तो नशेत असतांना संधी साधत रोहन यास गुळ नदी पात्रात केटी बंधाऱ्यात ढकलून खाली पडल्यानंतर गळा दाबून डोक्यात दगड मारून ठार केले. दरम्यान नदीपात्रात युवकाचा मृतदेह आढळून आल्याने बघ्यांनी पोलीस पाटील विजय पाटील यांना घटनेची माहिती दिली. त्यांनी पोलिसांना कळविले असता पोलिसांनी घाता-पाताच्या संशयावरून तपास सुरू केला असता सुनीलच्या चेहऱ्यावरील काटेरी झुडपे यांचे व्रण आढळून आल्याने त्यास पोलिसी खाक्या दाखवताच गुन्ह्याची कबुली दिली.

याप्रकरणी पोलिसात मृताची आई राधाबाई पानानंद पाटील (वय ५० वर्षे )यांच्या तक्रारीवरून अडावद पोलिसात सीसीटीएनएस गुरनं ६०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०३( १) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.घटनास्थळी एसडीपीओ अण्णासाहेब घोलप यांनी भेट दिली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ हे करीत आहेत.

## थोडक्यात

### भुसावळात नवकार महामंत्राचा जप

**भुसावळ ।** मराठी नववर्ष आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने भुसावळ शहरातील सुराणा साधना भवनात विशेष कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात प्रखर व्याख्याता व तपस्विनी माता संयम प्रभाजी म.सा. आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विश्वशांतीसाठी आणि सर्व लोकांना आरोग्य, आयुष्य आणि यश लाभावे, अशी शुभकामना व्यक्त करत नवकार महामंत्राचा जप केला. कार्यक्रमात संघपती जयंतीलाल सुराणा, जे.बी. कोटेचा, गौतम चोरडिया, कांतिलाल चोरडिया, विनोद मेहेता, अतुल ताथेड, राजेश बाफनासह जैन बांधव उपस्थित होते.

### ट्रकच्या धडकेत अनोळखी इसमाचा मृत्यू

**भुसावळ ।** येथील खडका रोड परिसरात नुकताच सायंकाळी झालेल्या अपघातात एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला. याबाबत असगर खान आयूब खान यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायंकाळी सुमारे ६.२० वा. वरणगावकडून जळगावकडे जाणाऱ्या मार्गावर जीजे १४ एक्स ८९७७ क्रमांकाच्या ट्रकने रस्त्यावरून जाणाऱ्या एका व्यक्तीस जोरदार धडक दिली असाल्याचे सांगितले असता ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पारोळा येथे रमजान ईद उत्साहात साजरी



प्रतिनिधी । पारोळा

मुस्लिम बांधवांचा समता, संयम, श्रद्धा आणि बंधुत्वाचे प्रतीक असलेला पवित्र सण ईद-उल-फित्र रमजान ईद निमित्त ईदगाह मैदानावर उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देतांना लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, पारोळा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक पवार , नगरसेवक नितीन सोनार, दीपक अनुष्ठान, नगरसेवक मनीष पाटील, राजेंद्र कासार, सुदाम चौधरी, प्रमोद कासार, छोटू हिरामण पाटील, मनोज जगदाळे, बापू मिस्तरी, धीरज महाजन, विवेक पाटील, पंकज मराठे, भूषण टिपरे, नजीरखां बेलदार, इमरान शेखसह उपस्थित मुस्लिम समाजबांधव.

### विवरे येथे रमजान ईद उत्साहाने साजरी

प्रतिनिधी । रावेर

तालुक्यातील विवरे येथे इस्लाम धर्मातील पवित्र सणापैकी एक सण ईद म्हणजेच ईद-उल-फित्र आज शनिवार रोजी विवरेसह परिसरात व तालुक्यात ईद उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. मुस्लिम अनुयायांनी आज शनिवारी विवरे येथील रावेर रोडवरील ईदगाह मैदानावर सकाळी ८-१५ वाजता येथे पोहोचून विशेष ईदची नमाज अदा केली. विवरे येथील जामा मशिदीचे इमाम मौलाना जमील शेख यांनी ईदची नमाज पठण केली. तालुक्यातील गावात ईदगाह आणि मशिदीमध्ये जमून मुस्लीम बांधवांनी ईद-उल-फित्र नमाज अदा केली.

# लासूर येथे संगीतमय श्रीराम कथेस सुरुवात

प्रतिनिधी । चोपडा




**तालुक्यातील लासूर गावात नव्याने उभारण्यात आलेल्या भव्यदिव्य श्रीराम मंदिरात श्रीराम, लक्ष्मण व सीता मातांच्या मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आज (दि. २१) अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला.या निमित्ताने सकाळी गावभर वाजत-गाजत कलश मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तीमय घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने या सोहळ्यात सहभाग नोंदविला.**

प्राणप्रतिष्ठेनंतर संगीतमय महर्षी वाल्मिकी श्रीराम कथेचीही मंगल सुरुवात करण्यात आली. सात दिवस चालणाऱ्या या कथेचा समारोप सातव्या दिवशी होणार आहे. संपूर्ण रामायण कथा रसिकांना ऐकायला मिळणार आहे. संगीतमय सादरीकरणामुळे कथेचे वातावरण अधिकच भक्तिमय व आकर्षक बनले आहे. गावातील आबालवृद्ध, महिला आणि युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कथेचा लाभ घेतला. या धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमामुळे लासूर गावात सध्या उत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून, भक्ती आणि श्रद्धेचा सुंदर संगम पाहायला मिळत आहे

## जे. टी. महाजन स्कूलमध्ये 'आम्ही सारे खवय्ये' उपक्रम

प्रतिनिधी । यावल

न्हावी येथील टी. महाजन सेमी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'आम्ही सारे खवय्ये' या उपक्रमाचे तिसरे वर्ष मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.

सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे चविष्ट व पौष्टिक पदार्थ बनवून आणले होते. शाळेत त्या पदार्थांचे छोटे-छोटे स्टॉल लावण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी रवा अप्पे, आलू पोंगा, ढोकळा, रसना, पाणीपुरी, चना मसाला चाट, भेळ, दहीगुलाब, लिंबूपाणी, मसाला पापड, पापडी चाट, फिंगर चिप्स, वडा पाव, खमण ढोकळा इत्यादी पदार्थ बनवून आणले होते. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या पदार्थाबद्दल माहितीही दिली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वयंपाकाची (कुकिंगची) आवड निर्माण करणे तसेच पौष्टिक व घरगुती अन्नाचे महत्त्व समजावून देणे हा होता. विद्यार्थ्यांना विविध पदार्थांविषयी माहिती मिळावी, ते तयार करण्याची प्रेरणा मिळावी, सर्जनशीलता वाढावी आणि भविष्यात हॉटेल मॅनेजमेंट या क्षेत्रात देखील विद्यार्थ्यांना करिअर घडवता येऊ शकते, हा या कार्यक्रमामागील हेतू होता. प्रमुख पाहुणे मयूर प्रकाश भारंबे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आपले करिअर घडविण्यासाठी हॉटेल मॅनेजमेंट हे देखील एक उत्तम क्षेत्र आहे. तसेच शाळेचे प्राचार्य नंदकिशोर सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन इयत्ता ७ वीची मोनाली चौधरी हिने केले, तर समारोप आरोही तायडे हिने केला. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# धरणगाव तालुक्यात रब्बीची काढणी, कमी भावामुळे नाराजी

प्रतिनिधी । धरणगाव

**शहरासह तालुक्यातील आनोरे, धानोरे, गारखेडे, पिंप्री, वाघळुद शिवारात रब्बी हंगाम काढणीची लगबग सुरू झाली आहे. परंतु, भाव कमी मिळत असल्याने शेतकरी वर्गात नाराजीचा सूर उमटू लागला आहे.**





यंदा पाटाचे आवर्तन असल्याने गहू, हरभरा, मकाची, लागवड व पेरणी अधिक प्रमाणात झाली होती. तालुक्यात मका व गहू काढणीला सुरूवात झालेली आहे. मात्र मकाला जेमतेम दीड हजार ते गहूला दोन हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात नाराजीचा सूर निघत असल्याचे चित्र दिसून येत आहे. हाती आलेल्या पिकात जेमतेम भांडवल निघत असल्याचे चित्र दिसत आहे. खरीप हंगामाची भर रब्बी हंगामात निघेल, अशी आशा बळीराजाला लागून होती. परंतु, ही आशा देखील फोल ठरल्याने शेतकरी प्रचंड नाराज झालेला आहे. दरम्यान, वातावरणात चढ-उतार होत असल्याने रब्बीच्या ज्वारीला देखील फटका बसतो, की काय ? अशी भीती सतावू लागली आहे.

# पंकज माध्यमिक विद्यालयात जागतिक वनदिन उत्साहात साजरा

## जंगल संवर्धनाचे केले वनविभागाने आवाहन

प्रतिनिधी । चोपडा


**येथील पंकज माध्यमिक विद्यालयात २१ मार्च रोजी मजागतिक वन दिनाफ्चे औचित्य साधून जंगल संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा जागर करण्यात आला. वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्षांचे महत्त्व पटवून देण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**




प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले वनपाल तुषार देवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जंगले ही पृथ्वीची फुफ्फुसे आहेत. जर आपण आज झाडे लावली आणि जगवली नाहीत, तर भविष्यात आपल्याला मोठ्या संकटांना सामोरे जावे लागेल. त्यांनी वनविभागाच्या विविध योजनांची माहिती देऊन प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही. आर. पाटील यांनी आपल्या भाषणात निसर्ग आणि मानवाचे अतूट नाते स्पष्ट केले. केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेले वृक्ष जगवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, असे त्यांनी नमूद केले. सूत्रसंचालन वैशाली पाटील यांनी केले.

### हर्षदा कोल्हटकरांना राज्य हिंदी नाट्य स्पर्धेत उत्कृष्ट अभिनयाबद्दल गुणवत्ता प्रमाणपत्र

प्रतिनिधी । गणपूर,ता चोपडा



येथील मूळ रहिवासी व नोकरी निमित्त जळगाव येथे स्थायिक झालेले हर्षदा रामकृष्ण कोल्हटकर यांना ६४ व्या महाराष्ट्र राज्य हिंदी नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत उत्कृष्ट अभिनयाबद्दल गुणवत्ता प्रमाणपत्र जाहीर झाले आहे.

३ फेब्रुवारी२०२६ ते १६ मार्च२०२६ दरम्यान वनामती, नागपूर येथील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृहात पार पडलेल्या राज्य हिंदी नाट्य स्पर्धेत अंतिम फेरीनंतर विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले.त्यात उत्कृष्ट अभिनयाबद्दल हर्षदा कोल्हटकर यांना गुणवत्ता प्रमाणपत्र जाहीर झाले आहे. या स्पर्धेत राज्यातून एकूण ५८ नाट्य प्रयोग सादर करण्यात आले होते. त्या येथील मूळ रहिवासी व जळगाव स्थित सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक रामकृष्ण कोल्हटकर यांच्या कन्या आहेत.त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### अमळनेरात वर्षप्रतिपदेनिमित्त पथसंचलन उत्साहात

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने वर्षप्रतिपदेनिमित्त सघोष पथसंचलन मोठ्या उत्साहात काढण्यात आले. प्रतापमिल कंपाऊंड येथे स्वयंसेवक एकत्र जमले. प्रारंभी ध्वजारोहण व संघ प्रार्थना झाल्यानंतर संचलनास सुरुवात झाली.**



संचलनात सर्वात पुढे भगवा ध्वज, त्यानंतर गण एक व दोन, त्यापाठोपाठ घोष पथक आणि त्यानंतर गण तीन ते सहा अशा शिस्तबद्ध रचनेत स्वयंसेवक सहभागी झाले होते. प्रताप मिल कंपाऊंड येथून कॉलेज रोड, धुळे रोड, भगवा चौक, मराठा मंगल कार्यालय, महाराणा प्रताप चौक, कचेरी रोड, बजरंग सुपर शॉप मार्गे पुन्हा प्रताप मिल कंपाऊंड येथे संचलनाची सांगता झाली. संचलन मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी आकर्षक रांगोळ्या काढून तसेच फुलांचा वर्षाव करून स्वयंसेवकांचे स्वागत केले. सर्व स्वयंसेवक गणवेशात शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी झाले होते. संचलनानंतर वर्षप्रतिपदेचा उत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी आद्य सरसंघचालकांना प्रणाम करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र शिंदे यांनी केले. जिल्हा संघचालक डॉ.मनोज साळुंखे यांनी संघरचनेतील विविध जबाबदाऱ्यांची घोषणा केली. यानंतर सांघिक पद्य. अमृत वचन व सुभाषितांचे सादरीकरण झाले. वैयक्तिक पद्य दिनेश पाटील यांनी सादर केले. प्रमुख वक्ते व अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य व्यंकयाजी भागयाजी यांनी बौद्धिक मार्गदर्शन केले. संघ प्रार्थनेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.